# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

## नियम क्र. २० / २०१०

### सेवानिवृत्त शिक्षकांना प्राचार्य पदावर नियुक्ती देण्याबाबतचे नियम.

ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २२१६/२००६ मध्ये दिनांक ३-१२-२००८ ला दिलेल्या निर्णयानुसार प्राचार्य पदे रिक्त असलेल्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये प्राचार्यांची नियुक्ती करणे बंधनकारक केलेले आहे.

आणि

ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयाचे अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय क्र. संकिर्ण २००९/(४३५/०९)/विशी-३, दिनांक ३० जानेवारी २०१० निर्गमित केलेला असुन, त्यानुसार मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेशीत केलेले आहे.

आणि

ज्याअर्थी, विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या प्राचार्य पदांच्या शैक्षणिक अर्हतेअभावी पात्रता धारक उमेदवार उपलब्ध होत नाहीत, परिणामतः अनेक संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांची पदे रिक्त असल्याचे मा. कुलगुरुंच्या निदर्शनास आलेले आहे.

आणि

ज्याअर्थी, प्राचार्यांच्या रिक्त पदांवर पुनर्नियुक्ती करण्याकरिता, विद्यापीठ नियम क्र. ९/२००३ मधिल तरतुदीनुसार, सेवा निवृत्त प्राचार्य सुद्धा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत आणि त्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या उपरोल्लेखित निर्णयाची व शासन आदेशाची परिपुर्णपणे अंमलबजावणी करणे विद्यापीठास शक्य होत नसल्याचे मा. कुलगुरुंच्या निदर्शनास आलेले आहे.

आणि

ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालयाच्या व शासनाच्या आदेशानुसार संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करणे विद्यापीठास क्रमप्राप्त आहे.

आणि

ज्याअर्थी, प्राचार्यांची रिक्त पदे भरल्या गेली नाहीत, तर विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होवू शकते, असेही मा. कुलगुरुंच्या निदर्शनास आले आहे.

आणि

ज्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी तत्कालीन मा. कुलगुरूंनी, त्यांचे अध्यक्षतेखाली, प्र-कुलगुरू, व्यवस्थापन परिषदेचे एक सदस्य व विद्यापीठाचे अधिकारी यांची एक समिती नियुक्त केली होती आणि समितीच्या दिनांक १९ जुलै, २०१० ला संपन्न झालेल्या सभेत केल्यागेलेल्या शिफारशीप्रमाणे, यु.जी.सी. ची शैक्षणिक अर्हता पुर्ण करणाऱ्या सेवा निवृत्त झालेल्या शिक्षकांची एक एक वर्षाकरिता प्राचार्यपदी नियुक्ती करून मान्यता प्रदान करण्याकरिता शासनाचे Concurance मिळण्यासाठी, विद्यापीठाद्वारे दिनांक ३१-७-२०१० च्या पत्रान्वये, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागास विनंती करण्यात आलेली आहे.

पुढे चालू......

आणि

ज्याअर्थी, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन २०१०, दिनांक २८ जुन, २०१० मधील परिच्छेद क्र. 4.4.7-A (i) (C) वर खालील प्रमाणे तरतूद आहे.

"4.4.7 -A (i) (c) Ten years teaching experience out of which at least five years teaching experience in a Secondary Teacher Educational Institution.

Provided that, in the event of non-availability of eligible and suitable candidates for appointment as Principal / Heads as per above eligibility critearia, it would be permissible to appoint retired Professor / Head in Education on contract basis for a period not exceeding one year at a time, till such time the candidates complete sixty five years of age."

त्याअर्थी, मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व शासनाच्या आदेशानुसार, संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करणे विद्यापीठास बंधनकारक असल्यामुळे, व्यवस्थापन परिषद, सेवानिवृत्त शिक्षकांना प्राचार्य पदावर नियुक्ती देण्याबाबतचे खालीलप्रमाणे नियम करित आहे.

१) हे नियम 'सेवानिवृत्त शिक्षकांना प्राचार्य पदावर नियुक्ती देण्याबाबतचे नियम, २०१०' म्हणून संबोधण्यात येतील.

२) हे नियम मंजुर झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

३) या नियमांच्या प्रयोजनाकरिता :-
'सेवानिवृत्त शिक्षक' म्हणजे महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ च्या कलम (२) (३४) मधील परिभाषेत अंतर्भूत असलेली व विद्यापीठ किंवा संलग्नित महाविद्यालयातून शिक्षक म्हणून सेवानिवृत्त झालेली व्यक्ती.

४) या नियमा अंतर्गत विद्यापीठ व संलग्नीत महाविद्यालयातून सेवा निवृत्त झालेले शिक्षक ज्यांना किमान १५ वर्षाचा अनुभव आहे व ते पी.एच.डी. धारक आहेत अशा सेवा निवृत्त शिक्षकांना एक-एक वर्ष कालावधीसाठी प्राचार्य पदावर विहीत निवड समितीमार्फत नियुक्त करता येईल.

५) उपरोक्त प्रमाणे प्राचार्य पदावर नियुक्त केलेल्या सेवा निवृत्त शिक्षकांना त्यांनी वयाची ६५ वर्षे पुर्ण करेपर्यंत एक-एक वर्षासाठी प्राचार्य पदावर नियुक्ती देता येईल.

६) अशा शिक्षकांच्या प्राचार्य पदावरिल नियुक्तीसाठी पार पाडावयाची प्रक्रिया व ईतर बाबी, विद्यापीठ नियम क्र. ९/२००३ प्रमाणे लागू राहतील.

७) सेवा निवृत्त झालेल्या शिक्षकांना वरिलप्रमाणे प्राचार्य पदावर नियुक्त केल्यास त्यांच्या वेतनाचा आर्थिक भार हा शासनावर पडणार नाही. त्यांच्या वेतनाचा आर्थिक भार संबंधित संस्थेच्या व्यवस्थापनाद्वारा वहन केला जाईल.

दिनांक : १५/१२/२०१०

स्वाक्षरी
कुलगुरु,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.